खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**
कोणतेही कार्य अडथळ्याशिवाय पार पडत नाही.
शेवटपर्यंत जे प्रयत्न करतात, त्यांनाच यश प्राप्त होते...

वर्ष : ०५ | अंक : २६१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.०३ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## चिमुकलीवर अखेर अंत्यसंस्कार, चार तासांनंतर नवले पूलावरील वाहतूक पूर्वपदावर

### नसरापूर आंदोलकांना पोलिसांनी हटवलं !



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, पुणे :** पुण्यातील भोर तालुक्यातील नसरापूर प्रकरणातील 'चिमुकलीला न्याय द्या, नराधमाला फाशीची शिक्षा द्या', अशी मागणी करत पुण्याच्या नवले पुलावर आंदोलन करणाऱ्या आंदोलकांना आता हटवण्यात आलं आहे. आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न निष्फळ ठरल्यानंतर पोलिसांनी बळाचा वापर करत हा नवले पूल मोकळा केला. त्यामुळे सुमारे चार तासांपासून सुरू असलेलं आंदोलन अखेर संपलं असून वाहतूकही हळूहळू पूर्वपदावर आल्याचं दिसून आलं.

चिमुकलीचं पार्थिव आंदोलन

भोर तालुक्यातील नसरापूरमध्ये काल शुक्रवारी रोजी एका चार वर्षांच्या चिमुकलीवर ६५ वर्षीय नराधमाने जबरदस्ती करून तिला संपवलं. नराधमाला पोलिसांनी अटक केली असली तरी चिमुकलीचे नातेवाईक आणि ग्रामस्थ प्रचंड संतापले. त्यांनी पुण्यातील नवले पुलाजवळ आज शनिवारी संध्याकाळी साडेसहा वाजल्यापासून ठिय्या आंदोलन सुरू केलं. चिमुकलीचं पार्थिव रुग्णवाहिकेत ठेवून त्यांनी ठिय्या आंदोलन केलं. 'आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा द्या'

नसरापूर आंदोलकांनी ऐन गर्दीच्या वेळी पुणे-बंगळुरू महामार्ग रोखून धरल्यामुळे पुण्यात मोठी वाहतूक कोंडी झाली. 'आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा द्या', अशी मागणी या आंदोलकांनी केली. या आंदोलकांची समजूत काढण्यासाठी पुणे पोलीस आयुक्त दाखल झाले. त्यांनी आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, आंदोलकांनी माघार घेण्यास नकार दिला.

हळूहळू वाहतूक पूर्वपदावर

आंदोलकांच्या आक्रमकतेमुळे या ठिकाणी मोठी गर्दी झाल्याचं दिसून आलं. परिणामी नवले पूलाच्या दोन्ही बाजूने वाहतूक कोंडी झाली. सुमारे चार तास हे आंदोलन सुरू होतं. यावेळी पुण्याचे आयुक्तही त्या ठिकाणी आले आणि त्यांनी आंदोलकांशी, चिमुकलीच्या कुटुंबीयांशी चर्चा केली. आंदोलक मागे हटत नसल्याने अखेर पोलिसांनी बळाचा वापर केला आणि नवले पूर रिकामा केला. त्यानंतर दोन्ही बाजूंनी हळूहळू वाहतूक पूर्वपदावर येऊ लागली.

पोलिसांकडून अधिकचा तपास सुरु

पोलिसांनी सांगितलं की, आरोपीला तातडीने अटक करण्यात आली असून त्याच्यावर पोक्सोसह गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीचा पूर्वीही गुन्हेगारी इतिहास असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे त्याच्या प्रवृत्तीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. या प्रकरणामुळे नसरापूरसह संपूर्ण भोर तालुका हादरला असून नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी सातत्याने होत आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्याची मागणीही जोर धरत आहे.

## सिंहगडावर २८ वर्षीय तरुणी मृतावस्थेत आढळली; थरारक रेस्क्यू ऑपरेशननंतर घटना उघड



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, पुणे :** सिंहगड किल्ल्यावर एक थरारक आणि धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. तुपखाण्याजवळील बुरुज परिसरात खोल दरीत एका तरुणीचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली. मनीषा धर्मदास गायकवाड (वय २८) असं या तरुणीचे नाव आहे.

अंगावर काटा आणणाऱ्या सिंहगडावरील या ठिकाणी पोहोचणंही अवघड असताना अशा परिस्थितीत रेस्क्यू टीमने जीव धोक्यात घालून ऑपरेशन सुरू केलं. घटनेची माहिती मिळताच हवेली पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल झाली. समोर शेकडो फूट खोल, काळजाचा ठोका चुकवणारी दरी होती. खाली काय आहे, याची खात्री नसतानाही टीमने शोध सुरू केला. बुरुजाजवळ काही संशयास्पद खुणा दिसताच सगळ्यांचं लक्ष त्या दिशेने वळलं. याच वेळी रेस्क्यू टीममधील कृष्णा मरगळे यांनी रॅपलिंग करून थेट दरीत उतरण्याचा धाडसी निर्णय घेतला. दोऱ्यांच्या आधाराने, प्रत्येक क्षण जीवघेणा ठरू शकत असताना ते खाली उतरू लागले. वर उभ्या असलेल्या टीमचा श्वास रोखला गेला होता.

काही वेळानंतर खालून आलेला सिग्नल सगळ्यांना हादरवून गेला दरीत एका तरुणीचा मृतदेह आढळला होता. यानंतर सुरू झाला सर्वात कठीण टप्पा. खोल दरीतून मृतदेह वर काढणं हे मोठं आव्हान होतं. तानाजी भोसले, गणेश सपकाळ, संदीप सोलासकर, नारायण जावळकर, संजय चोरगे, उत्तम पिसाळ, संतोष भगत, वैभव भोसले यांच्यासह अनेकांनी एकत्र येत जीवाची पर्वा न करता ही मोहीम पार पाडली. वनविभाग आणि अग्निशमन दलानेही मोलाचं सहकार्य केलं. काही तासांच्या अथक प्रयत्नांनंतर मृतदेह वर आणण्यात यश आलं. त्यानंतर या घटनेचं गूढ उलगडू लागलं.

प्राथमिक तपासात बुरुजावरून उडी मारून आत्महत्या केल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, या टोकाच्या निर्णयामागचं कारण अजूनही अज्ञात आहे. सिंहगडाच्या शांततेत घडलेली ही घटना अनेक प्रश्न मागे ठेवून गेली आहे. पोलिसांनी या घटनेच्या तपासाला सुरुवात केली असून यामध्ये काय गोष्टी बाहेर येतात याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## १ मे 'ड्राय डे' लाही अवैध दारू विक्रीला ऊत; प्रशासनाच्या कारवाईकडे नागरिकांचे लक्ष




**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०२, सोलापूर :** राज्यात १ मे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनानिमित्त 'ड्राय डे' घोषित करण्यात आला असतानाही दक्षिण सोलापूर तालुक्यात काही ठिकाणी अवैधरित्या दारू विक्री सुरू असल्याचे समोर आले आहे. शासनाने मद्यविक्रीवर बंदी घातली असतानाही काही ठिकाणी चोरट्या मार्गाने दारूची विक्री होत असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

ड्राय डेच्या दिवशी मद्यविक्री बंद असणे अपेक्षित असताना काही भागात जादा दराने दारू विक्री होत असल्याच्या तक्रारी स्थानिकांकडून करण्यात येत आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील काही अड्ड्यांवर व काही मद्यपान दुकानावर दिवस ,रात्री उशिरापर्यंत विक्री सुरू असल्याची चर्चा आहे.

यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, संबंधित विभागाने अशा अवैध विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

स्थानिक प्रशासन आणि पोलीस विभागाने अचानक छापेमारी करून ड्राय डेच्या दिवशी सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीला आळा घालावा, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

शासन नियम फक्त कागदावरच राहू नयेत, प्रत्यक्ष अंमलबजावणीही तितकीच महत्त्वाची आहे, अशी प्रतिक्रिया काही नागरिकांनी दिली.

## मुंबई नाशिक महामार्गावरील खारेगाव टोलनाका लवकरच पुन्हा सुरू होणार

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०२, कळवा (ठाणे) :** मुंबई नाशिक प्रवास अधिक वेगवान करण्यासाठी या महामार्गावरील महामार्गावरील माजिवडा ते वडपे या प्रकल्पाचे काम आता जवळ जवळ ९० टक्के पूर्ण झाले असून येत्या काही महिन्यात या मार्गिकेच्या निर्माणाचे काम आता पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबई-नाशिक महामार्ग आणि समृद्धी महामार्गावरून मुंबईच्या दिशेने होणारा प्रवास वेगवान होणार असला तरी वाहन चालकांना मात्र टोलचा भुर्दंड सहन करावा लागणार आहे. कळव्या लगतच्या खारेगाव येथील जुन्या टोलनाका भागात नव्याने ३४ पदरी मार्गिकेवर टोलनाका उभारण्याचे काम वेगाने सुरु झाले आहे. त्यामुळे वेगवान प्रवासा सोबतच आता प्रवाशांच्या खिशाला देखील कात्री बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मुंबई नाशिक महामार्गावरून दिवसाला हजारो अवजड वाहने उरण जेएनपीए येथून आणि गुजरात येथून भिवंडी किंवा नाशिकच्या दिशेने वाहतुक करतात. काही दिवसांपूर्वीच सुरु झालेला मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग देखील मुंबई नाशिक महामार्गाला भिवंडी येथील आमणे भागातून जोडतो. त्यामुळे समृद्धी महामार्गाची वाहने मुंबईत वाहतुक करण्यासाठी मुंबई नाशिक महामार्गानेच प्रवास करतात. तसेच कल्याण, भिवंडी भागातील हजारो हलकी वाहने याच महामार्गाने ठाणे, मुंबई आणि नवी मुंबई भागात वाहतुक करतात. या मार्गावर पूर्वी खारेगाव टोलनाका होता.

१९९८ या वर्षी हा टोलनाका सुरु झाला होता. टोलवसूली विरोधात अनेकदा आंदोलन देखील झाले होते. २०१७ मध्ये हा टोलनाका कायमस्वरुपी बंद करण्यात आला होता. त्यामुळे ठाणे ते भिवंडी, कल्याण आणि कल्याण, भिवंडी, नाशिक, उरण जेएनपीए येथील हजारो हलकी, जड-अवजड वाहन चालकांना टोलपासून मुक्तता मिळाली होती. टोल वसूली बंद होऊन अवघे ९ वर्ष पूर्ण होत असतानाच, माजिवडा-वडपे प्रकल्प बांधून पूर्ण झाल्यानंतर टोल वसूली केली जाणार आहे.

खारेगाव नव्या पूलाच्या उभारणीनंतर आता खारेगाव टोलनाका उभारणीस सुरुवात झाली आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर राज्य रस्ते विकास महामंडळ या मार्गाची १५ वर्ष देखभाल दुरुस्ती करणार आहे. तर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण टोलवसूली करणार आहे. ठाणे खाडी किनारा प्रकल्प (कोस्टल रोड) हा देखील या मार्गाला जोडला जाणार असून या अवजड वाहनांनाही टोलचा भार सहन करावा लागणार आहे. ३४ पदरी मार्गिकेवर हा टोलनाका उभा असेल.

दरम्यान माजिवडा ते वडपे हा २३.८० किमी लांबीचा प्रकल्प असून २१.३१ किमी पर्यंत म्हणजेच, ९० टक्के प्रकल्प पूर्ण झाला आहे. यातील साकेत पूल आणि खारेगाव खाडी पूल हे महत्त्वाचे टप्पे सुरु झाले आहेत. वडपे उड्डाणपूल येत्या आठवडा भरात सुरु होण्याची शक्यता आहे. येवई, वालशिंद, सोनाळे, सरवली पिंपळास येथील भुयारी मार्ग पूर्ण झाले आहेत. तर रेल्वे पूलाचे काम ७१ टक्के पूर्ण झाले आहे. चौकट याबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना विचारले असता, प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर टोलवसूली संदर्भातील निविदा काढल्या जातील असे त्यांनी सांगितले.

## शिवसेना प्रवेशावरून टीका; बच्चू कडू संतापले, ट्रोल करणाऱ्यांना उत्तर देताना संयम सुटला...



**दि.०२, नागपूर :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर आणि विधानपरिषदेची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी नागपुरात माध्यमांशी संवाद साधताना ट्रोल करणाऱ्यांवर जोरदार निशाणा साधला. या वेळी बोलताना त्यांचा संयम सुटल्याचे दिसून आले. ट्रोल करणाऱ्यांनी तर प्रभू श्रीरामांना नावे ठेवली आहेत, बाबासाहेबांनाही ठेवली आहेत आणि छत्रपती शिवाजी महाराज यांनाही ठेवली आहेत. मी तर त्यातला एक लहानसा माणूस आहे. असे हवसे, नवसे, गवसे हे जे कोणी येतात त्याला बच्चू कडू घाबरणारा नाही आहे. ट्रोल करणाऱ्यांचे माय आणि बाप दहा जण आहेत, असं बच्चू कडू म्हणाले .

बच्चू कडू पुढे म्हणाले की, ट्रोल करणाऱ्यांची आम्ही पर्वा करत नाही, ते ५० पैशांनी विकत भेटतात. सगळ्या पक्षांकडे आम्ही पाहतो, त्यांच्या केबिन ट्रोल करणाऱ्यांनी भरलेल्या आहेत. हे सगळे ट्रोल करणारे अर्धे बिकाऊ आहेत. माझ्या बाजूने किती ट्रोल दाखवायचे ते सांगा, एक-दोन लाखांचा खर्च आहे. त्यात काही मोठी गोष्ट नाही. पण कोणी ट्रोल करत असेल तरी 'हम कहा डरने वाले है', असे म्हणत त्यांनी विरोधकांना थेट आव्हान दिले.

दरम्यान, शिवसेनेत प्रवेशानंतर काही कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम असल्याच्या प्रश्नावरही त्यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, ज्यांना राजकीय काम करायचं आहे ते शिवसेनेत येणार. पण काही नालायक असतात ते काही सुटत नाही. ज्यांना सोबत राहायचे आहे त्यांनी व्यवस्थित राहावे, मी कोणालाही जबरदस्ती केली नाही, जबरदस्ती करणारही नाही. माझा राजकीय प्रवास सुरुवातीला शिवसेनेतून झाला, मध्ये प्रहारमध्ये होता. काही मोठे मोठे लोकं कोणता पक्ष सोडून मोठा पक्ष पकडला, पण बच्चू भाऊ पंचवीस वर्षे एकटा लढला आणि प्रहार म्हणून लढला आहे.

राजकीय आघाड्यांबाबत होत असलेल्या टीकेवर बच्चू कडू यांनी पलटवार केला. आता राष्ट्रवादी राष्ट्रवादीमध्ये विलीन होत आहे, त्याच्यावर टीका होत नाही, महानगरपालिका निवडणुकीमध्ये 'राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे' एकत्र आले त्यावर आमचं काही दुमत नाही, पण त्यांच्यावर टीका होत नाही, काँग्रेस सोबत शिवसेना बसली शिवसेनेसोबत काँग्रेस बसली, त्यांच्यावर टीका करत नाही, पण बच्चू कडू बरा आहे टीका करायला, असा टोला बच्चू कडू यांनी विरोधकांना लगावला.

## चार मजली घरात चार मुलांचा मृत्यू; घटनास्थळ पाहून स्थानिकांचा संताप !



**दि.०२, लखनऊ :** चार मुलांचे शव आढळून आल्यानं परिसरात खळबळ उडाली आहे. चार मजली घरात चार मुलांचे शव सापडले. त्यांच्या शरीरावर जखमा होत्या. यानंतर परिसरात संतापाची लाट उसळली. घटनेची माहिती मिळताच पोलीस मोठ्या संख्येनं गावात पोहोचले. वरिष्ठ अधिकारीदेखील घटनास्थळाकडे रवाना झाले आहेत. मुलांची आई बाल्कनीतून फरार झाली आहे. त्यामुळे संशयाची सुई तिच्याचकडे गेली आहे. ही घटना उत्तर प्रदेशच्या आंबेडनगर जिल्ह्यात घडली आहे.

नेमकं काय घडलं?

आंबेडकरनगरच्या अकबरपूरमधील मीरानपूर मोहल्ल्यात घडलेल्या घटनेनं परिसरात खळबळ उडाली. मीरानपूर मोहल्ल्यात असलेल्या मैदानाच्या शेजारी चार मजल्यांचं घर आबे. या घरात चार मुलांचे शव सापडल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यानंतर पोलीस मोठा फौजफाटा घेऊन घटनास्थळी पोहोचले. चार निष्पाप मुलांना संपवण्यात आल्याचं त्यांची अवस्था पाहून स्पष्ट झालं. या घटनेनं परिसरात संतापाचं वातावरण आहे.

पोलिसांना चारही मुलांचे शव बिछान्यावर सापडले. मुलांची आई फरार आहे. पोलीस अधीक्षक प्राची सिंह आणि फॉरेन्सिकच्या पथकानं घराचा मुख्य दरवाजा लावून घेतला आहे. या घटनेमागील कारणांचा उलगडा करण्याचा प्रयत्न पोलिसांकडून सुरु आहे. चार निष्पाप लेकरांना जीवे मारण्यात आल्यानं गावात संताप आहे. शरीफ, सऊद, उमर अशी मृतांची नावं आहेत. तर बयान असं मृत मुलीचं नाव आहे.

मृत मुलांचे वडील नियाज सौदी अरेबियात नोकरी करतात. मुलं त्यांच्या आईसोबत घरी राहायचे. घर सकाळपासून बंद असल्यानं शेजाऱ्यांनी पोलिसांना माहिती दिली. नियाजनं सौदीमध्ये पाकिस्तानी महिलेशी दुसरा निकाह केला आहे. नियाजच्या दुसऱ्या लग्नामुळे त्याची पहिली पत्नी तणावात होती. याच तणावातून तिनं मुलांना संपवून पळ काढल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.




## पोलिसांचा विचार कधी ?

कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिस दलाची. नागरिकांना भयमुक्त वातावरणात वावरता यावे, सण-उत्सव साजरे करताना कुठे अडचणी येऊ नयेत, सामाजिक सलोखा कायम राहावा, यासाठी सातत्याने पुढाकार घेणे, राजकीय मंडळींच्या सुरक्षेसाठी तैनात राहणे अशी एक ना अनेक कामे पोलिसांना करावी लागतात. छत्रपती संभाजीनगरमधील पोलिस अर्थातच त्यास अपवाद नाहीत. मात्र येथील पोलिसांवर मूळ कामापेक्षा अतिरिक्त कामाचा बोजा गेल्या काही दिवसांपासून वाढला आहे. त्याचा कुठे विचार झाला असेल असे वरकरणी तरी दिसत नाही!

राज्याच्या गृह विभागाने मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालय परिसरात नवीन पोलिस ठाण्यांना नुकतीच परवानगी दिली. वाढलेली लोकसंख्या, गुन्ह्यांचे प्रमाण पाहून नागरी सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था राखणे यांसाठी गृह विभागाने नवीन पदे मंजूर करून पोलिस ठाणी कार्यान्वित करण्यास मंजुरी दिली, हे स्वागतार्हच. या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगरचा विचार केला तर पोलिसबळ व पोलिस दलासाठी आवश्यक असलेल्या सोयीसुविधा म्हणाव्या त्या प्रमाणात उपलब्ध नाहीत. जवळपास १८ लाखांहून अधिक लोकसंख्येच्या या शहरात १७ पोलिस ठाणी आहेत. छत्रपती संभाजीनगर पोलिस आयुक्तालय कार्यक्षेत्रात ३,३०० पोलिसबळ आहे. दीर्घ प्रतीक्षेनंतर दोन नवीन ठाणी शहराला मध्यंतरी मिळाली. पूर्वी मंजूर असलेल्या पदसंख्येतच ही दोन्ही ठाणी सुरू करण्यात आली. सायबर पोलिस ठाणे कार्यान्वित करण्यात आले. आर्थिक गुन्हे शाखा, हायकोर्ट सुरक्षा विभाग कार्यरत आहेत. सुविधेसाठी दोन विभाग, तीन पोलिस ठाणी अशी चार स्टेशन तयार करण्यात आली.

छत्रपती संभाजीनगर शहराची गणना 'संवेदनशील शहर' म्हणून केली जाते. पर्यटन, शिक्षणासाठी राज्य, परराज्य, परदेशातून लोक-विद्यार्थी शहरात येतात. राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे शहर असल्याने व्हीआयपींचा कायम राबता असतो. लोकसंख्यावाढ, शहराचा विस्तार गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर झाला. त्यानुसार गुन्ह्यांची संख्याही वाढत आहे. सन २०२२मध्ये पोलिस आयुक्तालय हद्दीत नोंदविलेल्या गुन्ह्यांची संख्या ५४४६ होती. २०२३ मध्ये ५९४७, २०२४ मध्ये ६१४६, २०२५ मध्ये ५९०३ अशी आकडेवारी आहे. घडलेल्या गुन्ह्यांचा तपास, सण, उत्सव, महत्त्वाच्या दिवसांना बंदोबस्त, व्हीआयपी मूव्हमेंट, कोर्ट पेरवी, कंट्रोल रूमची कामे या सगळ्यासाठी मोठ्या प्रमाणात पोलिस बळ वापरले जाते. याशिवाय वाहतूक व्यवस्था, ज्येष्ठ नागरिक मदत कक्ष, दामिनी पथक कार्यरत आहेत.

पोलिस आयुक्तालय क्षेत्रात पोलिसांची संख्या वाढविण्यात आलेली नाही. दुसरीकडे कामाचा व्याप वाढत आहे. त्यामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवरील तणाव वाढत आहे, त्यांच्या आरोग्याचे प्रश्न डोकेवर काढू लागले आहेत. महत्त्वाच्या वेळी सुट्ट्या मिळण्याची अडचण होत आहे. शहरात वाढलेल्या गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांनी गस्त घालणे सुरू केले आहे. एका ठिकाणी गाडीच उपलब्ध नसल्याने गस्त घालायची कशी असा प्रश्न निर्माण झाला. अपुऱ्या सुविधाही अडचणीच्या ठरत आहेत. याची दखल वरिष्ठ पातळीवर घेणे गरजेचे आहे.

राज्यातील अन्य शहरांमध्ये जशी सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे, त्या पद्धतीने छत्रपती संभाजीनगरमधील पोलिस दल अधिक बळकट कसे होईल, यासाठी वरिष्ठ पातळीवर विचार होणे गरजेचे आहे. पोलिस ठाणी वाढविणे, कर्मचारी संख्या वाढविणे, पोलिस वाहनांची संख्या वाढविणे याबाबत लवकर निर्णय होणे अपेक्षित आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी, आमदार, मंत्र्यांनी यासाठी कुठलाही किंतु परंतु न बाळगता, श्रेयाचा विचार न करता सरकारकडे पाठपुरावा करून आपल्या पदरात माप पाडून घेण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. पोलिस ठाणी, पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांची संख्या वाढली तर शहराची कायदा व सुव्यवस्था चांगली राखण्यास मदत मिळेल. सध्या कार्यरत कर्मचाऱ्यांवरील ताण कमी होईल, हे नक्की.

**- मकरंद कुलकर्णी**

# मृत्यूचा पुरावा म्हणून चक्क मृतदेह का आणावा लागला?

मृत्यूचा पुरावा म्हणून मृतदेह गारीतून बाहेर काढून खांद्यावर घेऊन येणाऱ्या एका वृद्ध व्यक्तीचा व्हिडिओ मागील आठवड्यात समाजमाध्यमांवर व्हायरल झाला. त्याची हकीकत अशी

२६ जानेवारी, आपल्या प्रजासत्ताक दिनी, ओडिशामधील क्योंजार जिल्ह्यातील मलीपोसी गावाजवळील जंगलात राहणाऱ्या कालरा मुंडा या आदिवासी महिलेचे निधन झाले. ती ५६ वर्षांची होती. तिचा एकुलता एक मुलगाही काही वर्षांपूर्वीच मरण पावला होता. ५० वर्षांचा जितू मुंडा हा तिचा भाऊ आणि एकमेव नातेवाईक होता.बहिणीचे क्रियाकर्म जितूनेच पार पाडले. त्याने तिचे दफन केले. या क्रियाकर्मासाठी त्याच्याकडील सर्व पैसे खर्च झाले. या भावंडांकडे एक म्हैस होती; कालराने मरण्यापूर्वी ती विकली होती आणि त्यातून तिचा दवाखान्याचा खर्च भागवला होता. काही पैसे तिने बँकेत ठेवले होते, त्यातील काही आधीच खर्च झाले होते. काही दिवसांनी जितूला पैशांची गरज भासू लागली. तो मलीपोसी येथील ओडिशा ग्रामीण बँकेच्या शाखेत गेला. बहिणीच्या खात्यातील वीस हजार रुपये मिळावेत, यासाठी त्याने सर्व हकीकत सांगितली. मात्र, बँक कर्मचाऱ्यांनी शासकीय नियमांची अट त्याच्यासमोर ठेवली. बहिणीचा मृत्यू दाखला त्याला काही कारणांमुळे मिळवता आला नव्हता.

जितूला पैशांची अत्यंत गरज होती, पण बँकेतील कर्मचारी नियमांवर बोट ठेवून त्याला परत पाठवत होते. अखेरीस त्याची सहनशक्ती संपली. त्याने बहिणीला जिथे दफन केले होते ती जागा उकरून तिचा मृतदेह बाहेर काढला. प्लास्टिकच्या पोत्याने तिचे तोंड झाकले, तिला खांद्यावर घेतले आणि भर उन्हात, अनवाणी पायाने गावाकडे निघाला.

त्याच्या खांद्यावर बहिणीचा मृतदेह पाहून कोणीतरी व्हिडिओ बनवला, आणि तो काही क्षणांतच संपूर्ण देशभर व्हायरल झाला. यावेळी मात्र या व्हिडिओचा सकारात्मक परिणाम झाला. प्रशासन त्वरित जागे झाले आणि जितूला त्याचे पैसे मिळवून देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. पोलिसांच्या उपस्थितीत कालरा मुंडा हिचा मृतदेह पुन्हा दफन करण्यात आला.

वीस हजार रुपयांसाठी बहिणीचा मृतदेह उकरणारा जितू आणि साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या स्मशानातील सोनं या कथेमधील भीमा हे दोघे जणू एका जातकुळीतले असल्याचे जाणवले.

आपल्या शासकीय कार्यालयांतील कामकाजाची पद्धत पूर्णतः कागदोपत्री पुराव्यावर आधारित आहे, आणि ती अत्यंत ताठर आहे. एखाद्या योजनेत शासनाने थोडी लवचिकता आणली, की काही धूर्त लोक त्याचा गैरफायदा घेतात; परिणामी व्यवस्था पुन्हा कडक केली जाते. याचा सर्वाधिक फटका तळागाळातील




सामान्य माणसाला बसतो.

कागदपत्रांची यादी देऊन लाभार्थ्याला फाईल तयार करण्यास सांगितले जाते. एकेक कागद गोळा करता करता त्याची चप्पल झिजते. मनस्ताप, अपमान आणि लाचारी सहन करावी लागते. शेवटी तो मानसिकदृष्ट्या खचतो. पात्र असूनही कागदपत्रांच्या अभावामुळे तो अपात्र ठरतो आणि योजनेवर पाणी सोडतो. उलट, काही अपात्र लोक कागदोपत्री फेरफार करून योजनांचा लाभ घेतात.

जन्म आणि मृत्यू दाखले ही माणसाच्या जीवनातील पहिली आणि शेवटची कागदपत्रे आहेत. मागील शैक्षणिक वर्षात पारधी समाजातील काही मुलांना आधारकार्ड नसल्यामुळे इयत्ता पहिलीत प्रवेश नाकारण्यात आला होता. आधारकार्डसाठी जन्म दाखला आवश्यक; पण भटक्या समाजातील मुलांच्या जन्माची नोंद कुठेच नसते. त्यामुळे जन्म दाखला मिळवण्याची प्रक्रिया इतकी किचकट ठरते की पालक त्यातून माघार घेतात.

पोट भरायचं की कागद गोळा करत फिरायचं? हा त्यांचा साधा प्रश्न व्यवस्थेला समजत नाही. जन्म दाखला नाही, म्हणून आधार नाही; आणि आधार नाही, म्हणून शिक्षण नाहीही परिस्थिती स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही उद्भवली, ही खरोखरच शोकांतिका आहे.

ओडिशातील या घटनेतही मृत्यू दाखला काढण्याची प्रक्रिया समजावून सांगितली गेली नाही, किंवा आवश्यक मदत मिळाली नाही. परिणामी, जितूला टोकाचे पाऊल उचलावे लागले. प्रत्येक व्यवस्थेत पर्यायी मार्ग असतात; ते समजावून सांगणे हे कर्तव्यदक्ष शासकीय कर्मचाऱ्यांचे काम आहे.

आज शासकीय नोकऱ्यांसाठी कठीण स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होणारे अनेक कर्मचारी नोकरीत रुजू झाल्यानंतर नैतिकतेच्या परीक्षेत मात्र अपयशी ठरतात. अशा वृत्तीमुळे सामान्य नागरिकांना न्याय मिळत नाही आणि संपूर्ण यंत्रणा बदनाम होते.

शेवटी, नियमांच्या कठोर चौकटीत माणुसकी पुन्हा पुन्हा गुदमरू नये यासाठी प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्यांनी झटले पाहिजे.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**मो. नं. ९९२२८८२५४१**

# आला उन्हाळा, आरोग्य सांभाळा !!

एकेकाळी नाशिक हे थंड हवेचे शहर आणि अल्हाददायक हवामानासाठी प्रसिद्ध होते. असे हवामान द्राक्ष लागवडीसाठी जगभरात सर्वोत्तम मानले जाते. त्यामुळेच या भागाला महाराष्ट्राचा कॅलिफोर्निया' असे म्हटले जाते.

पूर्वी मुंबई आणि विदर्भातील माणसे खास उन्हाळा घालवण्यासाठी तीन महिने नाशिकला येत असत. याआधी उन्हाळ्यात घरातील फॅनची हवा देखील पुरेशी व्हायची. परंतु आता मात्र प्रत्येक घरात कूलर व एसीची आवश्यकता भासत आहे. याचे कारण म्हणजे वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, वृक्षतोड व प्रदूषण होय. यामुळेच नाशिकचाही पारा आता ४० ते ४३ अंश सेल्सिअस पर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे



नाशिकमध्येही उन्हाळ्याची तीव्रता दर वर्षी वाढतांना दिसत आहे. त्यासाठी आता कडक ऊन व उष्णतेची लाट आणि त्यामुळे होणाऱ्या त्रासापासून वाचण्यासाठी नाशिककरांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

दुपारी १२ ते ३ या वेळेत थेट उन्हात फिरणे टाळावे. अत्यंत आवश्यक काम असल्यास डोक्यावर टोपी, रुमाल, स्कार्फ किंवा छत्री तसेच डोळ्यावर गॉगल वापरावा. फ्रिजमधील थंड पाणी न पिता माठातील थंड पाणी पिऊन शरीराचे तापमान संतुलित ठेवावे. हलक्या व सुती रंगाचे सैल कपडे वापरावे यामुळे घाम सुकण्यास मदत होऊन त्वचारोग होत नाहीत. दुचाकीवर प्रवास करतांना पूर्ण अंग झाकले जातील असे कपडे वापरावे. तहान लागली नसली तरी थोड्या थोड्या वेळाने पाणी पीत राहावे. लिंबू पाणी, ताक, लस्सी, यासारख्या पेयांचा आहारात समावेश करावा.

पचनास हलके आणि ताजे अन्न खावे. जास्त तेलकट आणि मसालेदार पदार्थ टाळावेत.

ऊसाचा रस, नारळ पाणी, टरबूज, खरबूज, संत्री यांसारखी रसाळ फळांचे सेवन करावे .

जनावरे असतील तर ती सावलीत बांधावीत. शक्यतो सकाळी किंवा संध्याकाळीच बाहेरची कामे करावीत. जर चक्कर येणे, डोके दुखणे, उलट्या जुलाब होणे अशी लक्षणे दिसल्यास त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधावा.

नियमित विश्रांती घेणे आणि थंड वातावरणात राहणे गरजेचे आहे.

हा उन्हाळा आनंदाने घालायचा असेल तर आरोग्याची काळजी घेणे हाच सर्वोत्तम मार्ग आहे. आपण प्रत्येकाचे थोडी काळजी व योग्य सवयी अंगीकारल्यास आपण हा ऋतू सुरक्षित व सुखकर बनवू शकतो. चला तर मग आला उन्हाळा, आरोग्य सांभाळा हा संदेश संपूर्ण नाशिककरांना देऊन थंडगार पेये व फळांचा आस्वाद व सुट्टीचा मनमुराद आनंद घेत हा उन्हाळा अल्हाददायक घालऊ या.

**- लेखन -**
**योगेश कापडणीस**
**नाशिक औष्णिक विद्युत केंद्र एकलहरे**

## लव्ह जिहाद..

लव्ह जिहाद प्रकार
दावी कु वृत्ती विद्रुप
समस्या जटिल होई
गुन्हे प्रकाशांत तद्रुप

भुमिकाबदलत जाई
स्टँडघेई प्रसंगानुरूप
डागाळलासंशयग्रस्त
छानसमाज सुस्वरुप

कोण घाले खतपाणी
बदलू टाकत रंग रूप
राजकारणाला कुरण
नव्यांनी स्फुरण हुरुप

उघडीस येवू लागलेत
नवनवीन फंडे रे खूप
विदारक बनवा चित्रा
कुणी चोपडे तेल तूप

कसली भिती ग्रासली
का पीडित बसले चूप
एखादी धारिष्ट दाखवे
तोडी जखडले कुलूप

एफआयआर अस्वस्थ
नोंदी करता चिडीचूप
खोलवर रुजलेलीमुळे
भ्रम संभ्रमात अंधकूप

सत्य असत्य गोंधळात
अंतरात अंधार घडघूप
गुन्हेगारपकडण्यासाठी
उशीरा चालते धावधूप

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# १०१ व्या दिवशी तरी मराठी बोलतील का ?

परप्रांतीय टॅक्सी आणि रिक्षा चालकांना मराठी भाषा सक्तीची करण्याच्या निर्णयाला अखेर सरकारने शंभर दिवसांची मुदतवाढ दिली. आगामी शंभर दिवसात जर परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठी बोलता आली नाही तर त्याचा परवाना रद्द करण्यात येईल असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे.

परप्रांतीय रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी शिकण्यासाठी १०० दिवसांची मुदत दिल्यानंतर हा वाद तूर्त शांत झाला असला तरी प्रश्न पडतो की जे परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालक अनेक वर्ष महाराष्ट्रात राहूनही मराठी शिकले नाही ते अवघ्या १०० दिवसात मराठी शिकतील का? मराठी शिकण्याची या परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालकांची मानसिकता आहे का ? आणि जर त्यांची मराठी मानसिकताच नसेल तर १०० दिवस काय १०० वर्षांची मुदत दिली तरी ते मराठी शिकणार नाहीत आणि जर ते १०० दिवसात मराठी शिकले नाही.

तर १०१ व्या दिवशी सरकार त्यांचे परवाने खरोखरच रद्द करेल का? की त्यांच्या मुजोरीला बळी पडून पुन्हा मुदत वाढ देईल? वास्तविक जे परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालक



अनेक वर्ष महाराष्ट्रात राहूनही मराठी शिकू शकले नाहीत ते अवघ्या १०० दिवसात मराठी शिकतील ही अपेक्षा करणेच चूक आहे. अनेक वर्ष महाराष्ट्रात राहूनही मराठी न शिकणाऱ्या या मुजोर रिक्षा, टॅक्सी चालकांवर कारवाई व्हायलाच हवी. पण सरकार त्यांच्याकडे मतपेटी म्हणून पाहते. मतपेटीच्या जोरावरच ते महाराष्ट्रात राहूनही मराठीला तुच्छ लेखतात आणि मराठी शिकण्यास नकार देतात.

मतपेटीच्या जोरावरच ते मुजोरी करून सरकारलाही जेरीस आणतात. काही राजकीय नेतेही स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी या मुजोर परप्रांतीय रिक्षा टॅक्सी चालकांची बाजू घेतात हे मराठी आणि महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. आपल्या राज्यातील राजकीय नेत्यांनी दक्षिण भारतातील राज्यांचा आदर्श घ्यायला हवा. दक्षिण भारतातील राज्ये, राजकीय नेते आणि तेथील नागरिक त्यांची प्रादेशिक अस्मिता जपण्यासाठी जीवाचे रान करतात. दक्षिणात्य राज्यात परप्रांतीयांची मुजोरी खपवून घेतली जात नाही. दक्षिणात्य राज्यात रोजगारासाठी जाणाऱ्या परप्रांतियांना आधी तेथील स्थानिक भाषा शिकावीच लागते कारण तेथील नागरिक स्थानिक भाषेतच बोलतात. आपल्या राज्यात मात्र आपणच हिंदी भाषेत बोलतो मग हे परप्रांतीय मराठी भाषा का शिकतील? जर आपण या परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालकांशी मराठीत बोललो तर त्यांना स्वतःच्या पोटासाठी मराठी बोलावेच लागेल. सरकार या परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठी भाषा शिकण्यास मुदतवाढ देऊ अगर न देऊ मराठी भाषकांनी या परप्रांतीय चालकांशी मराठीतच बोलावे. जर परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालकांनी मराठी बोलण्यास नकार दिला तर त्या रिक्षा, टॅक्सीतून प्रवासच करू नये. असे केले तरच हे मुजोर रिक्षा, टॅक्सी चालक मराठी शिकतील आणि मराठीतून बोलतील.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पेण एज्युकेशन सोसायटीच्या बारावीचा निकाल एकूण १४.३१ टक्के

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०२, पेन (रायगड) :** पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्रायव्हेट हायस्कूल ज्युनिअर कॉलेजचा इयत्ता बारावीचा निकाल यंदा अत्यंत उल्लेखनीय लागला असून सर्वच शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयाच्या सायन्स शाखेचा निकाल तब्बल ९९.१४ टक्के, कॉमर्स शाखेचा ९७.७६ टक्के, तर आर्ट्स शाखेचा ८२.५५ टक्के इतका लागला असून एकूण पेन एज्युकेशन सोसायटीचा प्रायव्हेट हायस्कूल ज्युनिअर कॉलेजचा इयत्ता बारावीचा निकाल यंदा ९४.३१ टक्के निकाल लागला आहे.

या शाळेतील सायन्स शाखेतील प्रथम क्रमांक दिशा अमित टेमघरे९०.१७% तर द्वितीय क्रमांक केदार हरेश तुपे ८९.३३ टक्के, तृतीय क्रमांक शुभांग विनीत देव ८८.५०% चतुर्थ क्रमांक श्रमण नरेश गायकवाड ८५.१७%,पाचवा क्रमांक ज्ञानदा कौस्तुभ वेखंडे ८३% हिचा लागला आहे ते कॉमर्स शाखेचा प्रथम क्रमांक मो,फैज मो,फैयाज खान ९३.१७ % द्वितीय क्रमांक अक्षर चेतन पंड्या ९१.९३ % तृतीय क्रमांक रिया संदीप चव्हाण८९.८३% चतुर्थ क्रमांक श्रद्धा जगदीश गावंड व सावनी सुभाष पेंडसे यांना ८९.३३ % तर पाचवा क्रमांक श्रावणी अमित कवळे ८९.१७ % मिळाले आहेत तर कला शाखेतील प्रथम क्रमांक खुशबू दिनेश शर्मा ७१.१७ द्वितीय क्रमांक अनुष्का जनार्दन पेरवी ७१% तृतीय क्रमांक महेश मोहन पाटील ५७.८३ % चतुर्थ क्रमांक खुमा लिंबाजी ठाकरे ५६.८३ % पाचवा क्रमांक आर्यन धनाजी म्हात्रे ५६.६७% मिळाले आहेत.

या यशामध्ये विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले.

या उज्वल यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांचे पालक, मुख्याध्यापक तसेच शिक्षकवृंद यांचे सर्व स्तरांतून हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे. महाविद्यालयाच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. महाविद्यालय प्रशासनाने सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## कुंडलवाडीत कामगार दिनाचा पहिलाच गौरव सोहळा; नगराध्यक्षा कोटलावार यांची स्तुत्य कामगिरी



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०२, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी शहरात प्रथमच कामगार दिन आणि महाराष्ट्र दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा प्रेरणाताई गजानन कोटलावार यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमात शहरातील कामगार व शेतकरी वर्गाचा सत्कार करून त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यात आला. या उपक्रमामुळे कष्टकरी वर्गाला विशेष मान्यता मिळाली असून नागरिकांकडून या अभिनव संकल्पनेचे मोठ्या प्रमाणात स्वागत होत आहे. कामगार आणि शेतकरी हेच समाजाचे खरे आधारस्तंभ आहेत, असा प्रेरणादायी संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

या प्रसंगी पोलीस सहाय्यक निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, गजानन कोटलावार, शैलेश न्याकावार, राजेश्वर उत्तरवार, प्रकाश पाटील अर्जुने, डॉ. प्रशांत सब्बनवार, रमेश इरलावार, संजय गोनेलवार, साईनाथ भातनाते, संजय भास्कर, सचिन कोटलावार, गंगाधर कोटलावार, नगरसेविका सौ. नेहा गट्टूवार, भीम पोतनकर, संजय खुळगे, अमरनाथ कांबळे, नरसिंमलू कोटलावार, राहुल सब्बनवार तसेच डॉ.हनमंतराव लखमपुरे, डॉ.नरेश बोधनकर, नगरपालिका कर्मचारी व नागरिक पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे कुंडलवाडी शहरात सामाजिक ऐक्य अधिक दृढ झाले असून कष्टकरी वर्गाबद्दल आदराची भावना बळकट झाली आहे. नगराध्यक्षा प्रेरणाताई कोटलावार यांच्या कार्याची सर्वत्र प्रशंसा होत आहे.

## महाराष्ट्र कनिष्ठ महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल ९८ टक्के तर कला शाखेचा ९६ टक्के निकाल




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०२, नागपूर :** सावनेर तालुक्याच्या महाराष्ट्र कनिष्ठ महाविद्यालय खापरखेडा येथील विद्यार्थ्यांनी यावर्षीही इयत्ता बारावी बोर्डाच्या परीक्षेत उज्वल यश प्राप्त करून आपली यशस्वी परंपरा कायम ठेवली आहे. जाहीर झालेल्या बारावी बोर्डाच्या परीक्षेत महाविद्यालयातील विज्ञान शाखेचा निकाल ९८.००% तर कला शाखेचा निकाल ९६.००% इतका लागलेला आहे.

विज्ञान शाखेतील मेहुल सुंदरलाल मेश्राम या विद्यार्थ्यांने ८३.३३ % गुण प्राप्त करून महाविद्यालयातून प्रथम तर कु. निधी गणेश धांडे व कु. रिधिमा सुधाकर वासनिक या विद्यार्थिनींनी ७७.३३ % गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक व सुमित अशोक प्रजापती या विद्यार्थ्याने ७४.८३% गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच कला शाखेतील कु. मंजुषा देवराव गोंडाले ५८.६७% गुण प्राप्त करून महाविद्यालयातून प्रथम तर कु. स्वीकृती प्रभाकर खिलेकर हिने ५४.३३% गुणांसह द्वितीय क्रमांक व कु. अयाना शंकर वाकडे या विद्यार्थीनीने ५३.३३% गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष सुधीर केदार संस्थेच्या सचिव सुहासताई केदार यांनी शुभेच्छा दिल्या तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य अरुण वडस्कर पर्यवेक्षक नरेंद्र माहूरतळे शामली छानिकर कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी पर्यवेक्षक प्रा.विजय टेकाडे प्रा. संगीता चव्हाण, प्रा.सुषमा वानखेडे, प्रा.अनिल जाधव, प्रा. जितेंद्र ठाकरे, प्रा.दिगंबर आडे, प्रा.श्वेता रोकडे, प्रा.सुजित सायरे, प्रा. पपीता नेहारे प्रा.अर्चना बोरकर, प्रा.दीप्ती कुरुडकर, प्रा.विद्या सेलोकर, प्रा.प्रियंका लुटे, यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला व त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## ठाण्यात धावली पहिली इलेक्ट्रिक डबल डेकर बस; उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण





**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०२, ठाणे :** ठाणेकरांसाठी शनिवारचा दिवस ऐतिहासिक ठरला. शहराच्या सार्वजनिक वाहतुकीत नवे पर्व सुरू करत ठाणे महानगरातील पहिली इलेक्ट्रिक डबल डेकर बस आजपासून रस्त्यावर धावली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या पर्यावरणपूरक बसचे लोकार्पण करण्यात आले.

लोकार्पण सोहळ्यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी लुईसवाडी ते ठाणे महापालिका भवन असा प्रवास या डबलडेकर बसमधून केला. यावेळी त्यांनी बसच्या अत्याधुनिक सुविधांची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

ही बस जी.सी.सी. (Gross Cost Contract) तत्वावर ठाणे परिवहन सेवेत दाखल झाली आहे. त्यामुळे या बसेसच्या खरेदी व देखभालीचा कोणताही आर्थिक भार ठाणे परिवहन सेवेवर पडणार नाही, असे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले.

याप्रसंगी ठाणे महापौर शर्मिला पिंपळोलकर, महापालिका आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हनुमंत जगदाळे, परिवहन सभापती विलास जोशी, उपायुक्त जी. बी. मुंढे यांच्यासह अनेक नगरसेवक व अधिकारी उपस्थित होते.

### बसची वैशिष्ट्ये :

- प्रवासी क्षमता : ६५ प्रवासी बसून तर ३३ प्रवासी उभे राहून, असे एकूण ९८ प्रवासी एकावेळी प्रवास करू शकतात.
- मार्ग : सद्यस्थितीत ही बस तीन हात नाका ते गायमुख या वर्दळीच्या मार्गावर धावणार आहे.
- पर्यावरणपूरक : १०० टक्के इलेक्ट्रिक असल्याने धूर व आवाजाचे प्रदूषण नाही. ठाणेकरांचा प्रवास आता पूर्णपणे हरित होणार आहे.
- सुविधा: वातानुकूलित, सीसीटीव्ही, जीपीएस, मोबाईल चार्जिंग, आपत्कालीन बटण यांसारख्या सुविधा.

### लवकरच आणखी ९ बसेस

ठाणे परिवहनच्या ताफ्यात लवकरच अशा आणखी ९ इलेक्ट्रिक डबल डेकर बसेस दाखल होणार आहेत. टप्प्याटप्प्याने शहरातील इतर प्रमुख मार्गांवरही या बसेस सुरू केल्या जातील, असे आयुक्त सौरभ राव यांनी सांगितले.

### काय म्हणाले उपमुख्यमंत्री?

**ठाणे डबल डेकर एका दृष्टीक्षेपात**
- लांबी: ९ मीटर
- बॅटरी : २०० किमी रेंज एका चार्जमध्ये
- चार्जिंग वेळ: ३ ते ४ तास
- तिकीट दर : सामान्य बसप्रमाणेच राहणार

ठाणे शहराच्या विकासात परिवहन सेवेचे मोठे योगदान आहे.

इलेक्ट्रिक डबल डेकर बसमुळे ठाणेकरांचा प्रवास सुखकर, आराम दायी व पर्यावरणपूरक होईल. ठाणे शहराला देशातील सर्वात आधुनिक परिवहन सेवा देण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

## शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०२, नागपूर :** खापरखेडा वीज केंद्राच्या प्रकाशनगर वसाहतीत असलेल्या शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचा इयत्ता बारावीचा कला व वाणिज्य शाखेचा एकत्रित निकाल ८१.६६ टक्के लागला असून विद्यार्थ्यांच्या यशाने शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

कला शाखेतून एकूण ५८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी ५५ विद्यार्थी उत्तीर्ण झालेत. कला शाखेचा एकूण निकाल ९४.८२ टक्के लागला आहे तर दुसरीकडे वाणिज्य शाखेत ६२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी ४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून वाणिज्य शाखेचा निकाल ६९.३५ टक्के लागला आहे.



कला शाखेत प्रथम क्रमांक अश्विनी अरविंद कडबे हिने ६०० पैकी ४४७ गुण संपादन केले असून ७४.५०% गुण मिळविले आहे तर द्वितीय क्रमांक जुम देव रमेश डोईफोडे हिने ६०० पैकी ३६१ गुण संपादन केले असून ६०.१७% गुण मिळविले आहे.

वाणिज्य शाखेत प्रथम क्रमांक मानसी प्रेमदास केळवदे ६०० पैकी ४७३ गुण संपादन केले असून ७८.८३% गुण मिळविले आहेत तर द्वितीय क्रमांक अर्शिया इंमजाद शेख हिने ६०० पैकी ४१२ गुण संपादन करू ६८.६७% गुण मिळविले आहेत.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल विद्यालयाच्या प्राचार्या वीना पांडे, पर्यवेक्षक गणेश चिखले, प्राध्यापक चंद्रकांत गायकवाड यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले असून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.


## अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सरसकट उन्हाळी सुट्टी द्या; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०२, सुपा (अहिल्यानगर) :** राज्यात वाढत्या उन्हाची तीव्रता आणि उष्णतेच्या लाटेमुळे अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या आरोग्याचा तसेच सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या भीषण परिस्थितीचा विचार करता, अहिल्यानगर जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सरसकट एक महिन्याची उन्हाळी सुट्टी मंजूर करण्यात यावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना अंगणवाडी सेविका मदतनीस एकजूट सेवा संघाच्या वतीने अध्यक्षा जयश्री वाबळे-झावरे यांनी दिले आहे.सध्या अहिल्यानगर जिल्ह्यात तापमानाचा पारा ४२ अंश सेल्सिअसच्या पुढे जाऊ लागला आहे. अशा कडक उन्हामध्ये अंगणवाडीत येणाऱ्या लहान बालकांसह गरोदर आणि स्तनदा माता यांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सद्यस्थितीत अंगणवाडी सेविका १५ दिवस आणि मदतनीस १५ दिवस अशा आळीपाळीने उन्हाळी सुट्ट्यांचा लाभ घेतात. मात्र, या काळातही अंगणवाडी सुरूच ठेवावी लागते. ग्रामीण भागात अनेक अंगणवाड्या दुर्गम भागात असल्याने, तेथे बालके येत नसतानाही केवळ सेविका किंवा मदतनीस यांना पूर्ण वेळ अंगणवाडीत उपस्थित राहण्याची सक्ती करणे अन्यायकारक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी पारनेर तालुक्यातील एका अंगणवाडी शिक्षिकेचा उन्हाच्या तीव्रतेमुळे दुर्दैवी मृत्यू झाला होता.

या घटनेमुळे कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर झाला आहे. याशिवाय, ग्रामीण भागातील एका अंगणवाडीच्या लाभार्थ्यासोबत घडलेल्या अनुचित घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेणे गरजेचे असल्याचे नम ूद करण्यात आले आहे.अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी शासनाला पूर्ण सहकार्य दर्शवत, पोषण ट्रॅकरवरील सर्व कामे पूर्ण करून देण्याची तसेच बालकांचा आहार घरपोच देण्याची तयारी दर्शवली आहे. कोरोना काळाप्रम ाणेच हा पर्याय उपलब्ध करून द्यावा, अशी विनंती त्यांनी केली आहे.



> सध्या तापमानाचा पारा ४२ अंश सेल्सिअसच्या पुढे गेला आहे. अशा भीषण परिस्थितीत लहान बालके, गरोदर व स्तनदा माता यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. नुकत्याच घडलेल्या दुर्दैवी घटना पाहता कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. पोषण ट्रॅकरची कामे आणि आहाराचे वाटप आम्ही घरपोच करू, पण कर्मचाऱ्यांच्या जीवाशी खेळ थांबवून प्रशासनाने त्यांना सरसकट एक महिन्याची उन्हाळी सुट्टी द्यावी.
>
> **- जयश्री वाबळे-झावरे**
> **(अध्यक्षा : अंगणवाडी सेविका मदतनीस एकजूट सेवा संघ)**

हे निवेदन देताना अंगणवाडी सेविका मदतनीस एकजूट सेवा संघाच्या अध्यक्षा जयश्री वाबळे-झावरे, उपाध्यक्ष छाया सारबंदे, सचिव संगीता गागरे-उंडे आणि नगर अध्यक्ष प्रभावती सत्रे उपस्थित होत्या. तसेच समन्वय समितीचे पदाधिकारी रामकृष्ण पाटील, युवराज बैसाणे आणि संजय मापले यांचे ही सहकार्य लाभले. प्रशासनाने या संवेदनशील विषयावर तात्काळ निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांना सरसकट एक महिन्याची उन्हाळी सुट्टी द्यावी, अशी मागणी कर्मचाऱ्यांकडून होत आहे.

## रक्षा रक्षकांचा महाराष्ट्र दिनी उपमुख्यमंत्र्याच्या हस्ते सत्कार

**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.०१, ठाणे (नवी मुंबई) :** जुईनगर रेल्वे स्टेशन येथे शनिवार दिनांक २९ जून २०२४ रोजी कर्तव्यावर हजर सुरक्षा रक्षक मंडळाचे सुरक्षा कर्मचारी अविनाश कालिदास शिंदे व महिला सुरक्षा रक्षक मोहिनी प्रदीप शिंदे हे आपले कर्तव्य बजावत असताना



दुपारी ३ वाजता दरम्यान सीएसटी पनवेल लोकल जुईनगर रेल्वे स्टेशन येथे आली असता एका प्रवाशाला ट्रेन चा धक्का लागून प्रवासी जखमी अवस्थेत ट्रेन खाली पडल्याचे समजले, क्षणाचाही विलंब न करता कर्तव्यावरील दोन्ही कर्मचारी घटनास्थळी पोचले व घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन ताबडतोब संबंधित पोलिस स्टेशनला व स्टेशन मास्तर यांना याची माहिती दिली. परंतु सदर प्रवासी ट्रेन खाली जखमी अवस्थेत पडून होता व त्याचा रक्तस्राव होत असल्याचे दोन्ही कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आले. अविनाश शिंदे यांनी ट्रेन खाली जाऊन मोहिनी शिंदे यांच्या मदतीने जखमी प्रवाशाला ट्रेन खालून बाहेर काढले. तत्काळ ट्रेचर आणून जखमी प्रवाशांना वैद्यकीय उपचाराकरिता हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात आले. या धाडशी कृत्याचे सर्व रेल्वे प्रवाशांकडून कौतुक करण्यात आले. या त्याचा कार्याबद्दल १ मे म हाराष्ट्र दिनानिमित्त राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

# महाबळेश्वरमध्ये ६७ वा महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा !

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०२, महाबळेश्वर :** संपूर्ण राज्यासह महाबळेश्वरमध्येही ६७ वा महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. महाबळेश्वर शहरातील शासकीय कार्यालये, निमशासकीय संस्था येथे मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रध्वजवंदन करून महाराष्ट्र दिनाचा सोहळा उत्साहात पार पडला.

मुख्य शासकीय राष्ट्रध्वजवंदन महाबळेश्वर तहसील कार्यालयात तहसीलदार सचिन मस्के यांच्या हस्ते करण्यात आले. पंचायत समिती म हाबळेश्वर येथे सभापती शंकुतला चोरम ले यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले महाबळेश्वर नगरपालिकेच्या प्रांगणात नगराध्यक्ष सुनील शिंदे यांच्या हस्ते राष्ट्रध्वजवंदन करण्यात आले.

सुभाषचंद्र बोस चौकात उपनगराध्यक्ष नासिरभाई मुलाणी यांच्या हस्ते राष्ट्रध्वजवंदन संपन्न झाले.

बँकेचे चेअरमन सी. डी. बावळेकर यांच्या हस्ते महाबळेश्वर अर्बन बँक येथे ध्वजारोहण करण्यात आले.

**उपस्थित मान्यवर :** या सोहळ्याप्रसंगी मुख्याधिकारी योगेश पाटील, माजी नगराध्यक्ष डी. एम. बावळेकर, गटनेते ॲड. संजय जंगम, नगरसेवक अफजल सुतार, आबा शिंदे, रोहित ढेबे, रवींद्र कुंभारदरे, संतोष



अखाडे, राजू नालबंद, किसन शेठ शिंदे आणि मिलिंद ढेबे उपस्थित होते.

महिला प्रतिनिधी ज्येष्ठ नगरसेविका विमल पारठे, संगिता वाडकर, विद्या बावळेकर, स्मिता पाटील, रेश्मा ढेबे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच युसूफ शेख, राजा गुजर, शंकर ढेबे प्रतिष्ठित नागरिक, शालेय विद्यार्थी, शिक्षक, नगरपालिका कर्मचारी आणि अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अर्बन बँकेचे चेअरमन नदीम शा२वान, संचालक राजेश कुंभारदरे, समीर सुतार, शरद बावळेकर, जावेद वलगे, संपत जाधव, विजयकुमार दस्तुरे संचालिका उषा ओंबळे, मनिषा पारठे, मुख्य व्यवस्थापक फकीरभाई वलगे, कर्मचारी वर्ग यांच्यासह बँकेचे खातेदार व सभासद उपस्थित होते.

# लाठी-काठी विश्वविक्रमात संस्कार श्रावणपाटील चा उल्लेखनीय सहभाग

**अक्षराज : कृष्णा श्रावणपाटील**

**दि.०२, नवी मुंबई :** नवी मुंबईतील उल्वे येथे पारंपरिक मराठी युद्धकलेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल असा जागतिक विक्रम यशस्वीरीत्या प्रस्थापित करण्यात आला. दुहेरी लाठी फिरवण्याच्या सामूहिक सादरीकरणाद्वारे ८१ विद्यार्थ्यांनी प्रत्येकी एक तास या प्रमाणात तब्बल ८१ तास सलग प्रदर्शन करत अद्वितीय कामगिरी साकारली. या विक्रमाची नोंद Golden Book of World Records मध्ये अधिकृतरीत्या करण्यात आली आहे.

या ऐतिहासिक विक्रमात कोकणातील उटंबर गावचे पहिले पत्रकार, कृष्णा श्रावणपाटील यांचा मुलगा संस्कार श्रावण पाटील याचा सहभाग विशेष ठरला. आपल्या मेहनत, चिकाटी आणि



शिस्तीच्या जोरावर संस्कारने गावासह संपूर्ण कोकणाचा मान उंचावला असून, त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

## उटंबरचा अभिमान जागतिक मंचावर!

सदर उपक्रम 'Warriors' Club' नवी म ुंबई यांच्या वतीने अत्यंत शिस्तबद्ध व भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमासाठी प्रशिक्षक ओंकार रंदवे आणि सुरेंद्र शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या नेतृत्वाखाली सर्व विद्यार्थ्यांनी एकसंधता, समन्वय आणि कौशल्य यांचे उत्कृष्ट प्रदर्शन घडवून आणले.

ही पारंपरिक लाठी-काठी कला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमी युद्धपरंपरेचा अमूल्य वारसा जपणारी असून, युवकांमध्ये शौर्य, शिस्त आणि संस्कृतीची जाणीव दृढ करणारी ठरत आहे. या विक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या पारंपरिक कलेला जागतिक स्तरावर नवे व्यासपीठ मिळाले आहे.

या अभूतपूर्व यशाबद्दल सर्व सहभागी विद्यार्थी, त्यांचे पालक, प्रशिक्षक तसेच आयोजक संस्थेचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या अथक परिश्रम, समर्पण आणि जिद्दीमुळे हा विक्रम साकार होऊ शकला.

उटंबरसारख्या ग्रामीण भागातून जागतिक विक्रमात सहभाग नोंदवणारा संस्कार श्रावणपाटील हा नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आदर्श ठरत असून, हा क्षण संपूर्ण कोकणासाठी अभिमानाचा आणि प्रेरणादायी ठरला आहे.

# सबर्बन मुंबई तायक्वांदो संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

## आंतरराष्ट्रीय पंच सुभाष पाटील यांचे खेळ, खेळाडू व संघटनेसाठी मोलाचे मार्गदर्शन

**अक्षराज : संदीप येवले**

**दि.०२, मुंबई :** तायक्वांदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबई हि अधिकृत जिल्हा संघटना तायक्वॉंदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई या अधिकृत राज्य संघटनेशी संलग्न आहे. तायक्वांदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबईची वार्षिक सर्वसाधारण सभा १ मे २०२६ रोजी विक्रोळी पूर्व येथे सकाळी १०.३० वाजता संघटनेचे अध्यक्ष संदिप येवले यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

या सभेसाठी तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे सचिव,आंतरराष्ट्रीय पंच, तायक्वांदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबईचे चेअरमन सुभाष पाटील उपस्थित होते. कै.विनायक गायकवाड सर हे तायक्वांदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबईचे अध्यक्ष होते. त्यांच्या निधनानंतर हि पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आली. ह्या संघटनेची जबाबदारी सर्वस्वी सुभाष पाटील यांच्यावर असते.

जिल्हा संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी एकूण १२ सभासद हजर होते.वार्षिक सर्वसाधारण सभेत संघटनेच्या अनेक विषयावर चर्चा करण्यात आली.

तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे सचिव, आंतरराष्ट्रीय पंच सुभाष पाटील यांनी सबर्बन मुंबई जिल्ह्याची प्रगती विषयी म



ोलाचे मार्गदर्शन केले. सन २०२६-२०२७ या वर्षातील सब ज्युनिअर, कॅडेट, ज्युनिअर, सिनिअर स्पर्धेसाठी वेगवेगळ्या कमिटी बनवून टेक्निकल जबाबदारी आंतरराष्ट्रीय तायक्वांदो प्रशिक्षक रॉबिन मेंझेस व श्रीकांत शिवगण यांच्यावर दिली आहे.

तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेच्या शेवटी संघटनेचे सचिव संदिप चव्हाण यांनी सभेसाठी उपस्थित सर्वांचे आभार मानले व सभा संपली असे जाहीर केले.

# कौसडीतील पाणीटंचाईवर राजकारणाचा सावट; ग्रामस्थ त्रस्त !

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०२, कौसडी (जिंतूर) :** उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना कौसडी गावातील पाणीटंचाईने भीषण रूप धारण केले आहे. तापमान ४२ ते ४३ अंशांवर पोहोचले असतानाही गावकऱ्यांना पाण्यासाठी अक्षरशः वनवण फिरावे लागत आहे. ग्रामपंचायत सरपंच मोबीन कुरैशी यांच्या नेतृत्वाखालील प्रशासन असो किंवा जिल्हा परिषद सदस्य माणिक हरकळ यांचे सत्ताधारी प्रतिनिधित्व असो दोन्ही पातळ्यांवरून या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून कौसडी गावातील पाणीप्रश्न कायम असून, दरवर्षी उन्हाळा आला की परिस्थिती अधिकच बिकट होते. गावकऱ्यांनी वेळोवेळी निवेदने देऊन प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला, मात्र या निवेदनांना केवळ कागदी घोडेच ठरले आहेत. प्रत्यक्षात कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. आज गावातील श्रीमंत लोक पैसे मोजून पाणी खरेदी करत असताना, गरीब कुटुंबांना मात्र २ ते ३ किलोमीटर अंतरावरून डोक्यावर घागरी घेऊन पाणी आणावे लागत आहे. ही विषमता आणि हालअपेष्टा पाहता प्रशासनाचा हलगर्जीपणा उघडपणे समोर येतो. एवढेच नव्हे तर, काही कुटुंबांनी पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे गाव सोडण्याचा निर्णय घेतला आहे, ही बाब अधिक चिंताजनक आहे.दरम्यान, गावात लग्नसराईचा हंगाम सुरू असतानाही पाण्याचा प्रश्न अधिक तीव्र झाला आहे. अशा वेळी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे अपेक्षित



असताना कोणतीही हालचाल दिसत नाही. टँकर व्यवस्था, नवीन विहिरी किंवा जलसंधारणासारख्या उपाययोजना केवळ कागदावरच मर्यादित राहिल्या आहेत.

या संपूर्ण परिस्थितीत सर्वात खेदजनक बाब म्हणजे ग्रामस्थांची निष्क्रियता. गावातील तरुण आणि नागरिक राजकीय गटबाजीमध्ये अडकून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत, मात्र एकत्र येऊन प्रशासनाविरोधात ठोस आंदोलन उभे करत नाहीत. एकजूट नसल्यामुळेच पाणीप्रश्न कायम आहे, अशी भावना अनेक सजग नागरिक व्यक्त करत आहेत.राजकारणी सत्ताधारी असो वा विरोधक दोघांनीही या प्रश्नावर केवळ आश्वासने देत वेळ काढली आहे. आता तरी सर्वांनी राजकारण बाजूला ठेवून गावाच्या मूलभूत गरजांकडे लक्ष देणे गरजेचे आहे. अन्यथा, कौसडी गावाचा पाणीप्रश्न आणखी गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.आता गावकऱ्यांनी एकत्र येऊन प्रशासनाला जाब विचारण्याची वेळ आली आहे, अन्यथा 'पाणी' हा प्रश्न नाही तर संकट बनून राहणार आहे. कौसडी गावातील भीषण पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर गावाचे सरपंच मोबिन कुरेशी तसेच जिल्हा परिषद सदस्य माणिक हरकळ हे प्रशासनाकडून पाणीप्रश्न सोडविण्यात कुठेतरी कमी पडत असल्याचे चित्र सध्या स्पष्टपणे दिसून येत आहे. गावकऱ्यांच्या वाढत्या नाराजीमध्येही या गंभीर प्रश्नावर ठोस उपाययोजना होत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.एकीकडे ग्रामस्थ पाण्यासाठी त्रस्त असताना, दुसरीकडे स्थानिक कार्यकर्ते सोशल मीडियावर एकम ेकांवरटीका-टिप्पणी करण्यात व्यस्त असल्याचे दिसत आहे. फेसबुक, व्हॉट्सअपसारख्या माध्यमांवर आरोप-प्रत्यारोपांचे सत्र रंगत असले तरी प्रत्यक्षात गावातील मुख्य प्रश्न सोडवण्यासाठी कोणताही ठोस पुढाकार घेतला जात नाही, ही बाब अधिक चिंताजनक ठरत आहे.

गावात पाण्यासाठी महिलांना व नागरिकांना किलोम ीटरच्या अंतरावरून पाणी आणावे लागत आहे, मात्र यावर एकजूट होऊन उपाययोजना करण्याऐवजी राजकीय आणि वैयक्तिक वादांना अधिक प्राधान्य दिले जात आहे. सोशल मीडियावर लढण्यापेक्षा प्रत्यक्षात गावासाठी एकत्र या, अशी मागणी आता सजग नागरिकांकडून होत आहे. राजकारण, गटबाजी आणि एकमेकांवरील आरोप याम ध्येच वेळ वाया जात असताना, गावाचा मूलभूत प्रश्न मात्र जसाच्या तसा राहिला आहे. सत्ताधारी आणि स्थानिक नेतृत्वाने आता तरी जबाबदारी ओळखून प्रशासनाशी सम न्वय साधत पाणीप्रश्नावर तातडीने तोडगा काढणे गरजेचे आहे.

# थोडक्यात

## १८व्या ज्युनियर राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेत मुंबईची दमदार कामगिरी



**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०२, मुंबई :** कर्नाटक येथे पार पडलेल्या १८व्या ज्युनियर राष्ट्रीय डॉजबॉल अजिंक्यपद स्पर्धेत मुंबई डॉजबॉल संघाने उल्लेखनीय कामगिरी करत मुलींच्या गटात उपविजेतेपद,तर मुलांच्या गटात तृतीय क्रमांक पटकावला.

२३ ते २६ एप्रिल २०२६ दरम्यान झालेल्या या स्पर्धेत देशभरातील बलाढ्य संघ सहभागी झाले होते. कठीण प्रतिस्पर्ध्यां विरुद्ध मुंबईच्या खेळाडूंनी जिद्द,शिस्त,वेगवान हालचाली आणि अचूक डॉज यांचा उत्कृष्ट संगम सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली. मुंबईच्या मुलींच्या संघाने सातत्यपूर्ण आणि आत्मविश्वासपूर्ण खेळ करत अंतिम फ ेरी गाठली आणि उपविजेतेपद मिळवले. मुलांच्या संघानेही झुंजार लढत देत तृतीय क्रमांकावर आपली छाप उमटवली.

या यशामागे प्रशिक्षक नरेश राऊत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.त्यांच्या योग्य रणनीती,अनुभव आणि सातत्यपूर्ण प्रशिक्षणामुळे खेळाडूंमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.तसेच विनायक देवकर आणि श्लोक अंचन यांनी पंच म्हणून जबाबदारी पार पाडली.

**मुंबई मुलींचा संघ :-** हृदया सुर्वे, सारा सावंत,नेत्रा कंसारा, दुर्वा डापले,हेमांक्षी बामणे, अन्वी बुरीचा, गौरी खोत, दाक्षी थोरात,आस्था शिंगाडे,कृषिका शाह, निशा झावेरी, वेदिका शाह.

**मुंबई मुलांचा संघ :-** वेदांत फडतरे, समर्थ कदम, राज बाडी, भार्गव पंचाल, जयसिंग परमार, चैतन्य आचार्य, शौर्य तांडुलकर, कृष्णा कोंडल, संप्रीत पुजारी, दिव्यम गोलांबरे, श्रीश नायर.

सदर स्पर्धेच्या समारोपप्रसंगी भारतीय डॉजबॉल महासंघाचे सचिव पी.एस.बरार,तांत्रिक समिती प्रमुख ख्वाजा अहमद, ऑर्गनायझिंग सेक्रेटरी डॉ. लक्ष्मण पडीमनी आणि इलय राजा यांनी मुंबई संघाचे कौतुक करून अभिनंदन केले. तसेच मुंबई डॉजबॉल असोसिएशनचे अध्यक्ष अरविंद दादा प्रभू,ऐश्वर्याताई शेटे,सचिव जगदीश अंचन आणि माला कामराज यांनीही संघाच्या यशाबद्दल अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मुंबई संघाच्या या यशाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की मेहनत,शिस्त आणि संघभावना यांच्या जोरावर कोणतेही लक्ष्य गाठता येते. हे यश मुंबईतील युवा खेळाडूंना नवी प्रेरणा देणारे ठरणार आहे.

## विश्वशांती समता मिरवणुकीचे खापरखेड्यात जल्लोषात स्वागत



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०२, नागपूर :** खापरखेडा येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक विकास संस्थेच्या वतीने आयोजित विश्वशांती समता मि रवणुकीचे उत्साहपूर्ण वातावरणात जल्लोषात स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदनेने होत भगवान बुद्धांना अभिवादन करण्यात आले व उपस्थितांनी सामूहिक वंदना घेतली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिपाईचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज बोरकर होते तर खापरखेडा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ता दिलीप बन्सोड यांच्या हस्ते द्वीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. मिरवणुकीत चिचोली, खापरखेडा व परिसरातील बौद्ध उपासक-उपासिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. स्थानिक नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणावर उपस्थिती दर्शवून मिरवणुकीचे स्वागत केले. संस्थेच्या वतीने मिरवणुकीत सहभागी झालेल्या उपासक-उपासिकांना फलाहाराचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन राहुल बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष शरद पाटील, सचिव मिलिंद रंगारी तसेच संचालक मंडळाच्या सदस्यांनी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. महिला व पुरुष कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहभागामुळे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. सामाजिक ऐक्य, समता आणि शांततेचा संदेश देणाऱ्या या मिरवणुकीला प्रकाश नगर वसाहतीत उत्साहपूर्ण प्रतिसाद मिळाला असून पुढील प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## खापरखेडा वीज केंद्रात महाराष्ट्र दिन साजरा



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०१, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातर्फे सौदामिनी प्रांगणात महाराष्ट्र दिन मुख्य अभियंता विवेक रोकडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून साजरा करण्यात आला. याप्रसंगी संविधान उदेशिकाचे वाचन करून राष्ट्रीय गीत व वंदे म ातरमचे गायन करण्यात आले.

महाराष्ट्र दिवस व कामगार दिवसाचे औचित्य साधून खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथे कामगारांसाठी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन मुख्य अभियंता विवेक रोकडे यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेत २१० मेगावाट (मेंटेनन्स) संघ विजेता तर ५०० मेगावाट (सुरक्षा) संघ उपविजेता ठरला. सर्व स्पर्धकांना उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

यावेळी उपमुख्य अभियंता नारायण राठोड, उपमुख्य अभियंता (प्रशासन) नितीन रोकडे, अधीक्षक अभियंता प्रवीण रोकडे, विलास कुमार उके, दिनेशदत्त शुक्ला, शिरीष वितोंडे, वरिष्ठ व्यवस्थापक सुरक्षा (प्रभारी) रोहन धोटे, काम गार कल्याण अधिकारी आनंद वाघमारे यांच्यासह अनेक अधिकारी, अभियंता, कर्मचारी, महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.